ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४


LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Regd. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष ३१ | पुणें, बुधवार १८ ऑगस्ट, १९६५ | अंक १६

स्वातंत्र्याच्या १९व्या वर्षात पदार्पण करतांना—

अन्नाच्या बाबतीतील आपले परावलंबन आता दूर झालेच पाहिजे,
अन्नोत्पादन वाढविण्यासाठी शेतीला विज्ञानाची जोड दिली पाहिजे.





त्यासाठी—

★ मशागतीच्या सुधारलेल्या पद्धती
★ सुधारलेली बियाणी
★ सुधारलेली अवजारे

वापरण्याचा शेतकऱ्यांनी आज निर्धार केला पाहिजे.

स्वातंत्र्य दिन १९६५

प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

**पोस्टामधील निद्रिस्थ खातीं**—हिंदमधील ४४ लाख पोस्टाच्या कचेऱ्यांतून ११ कोटी रुपयांची रकम सेव्हिंग्ज खात्यांत पडून आहे. पोस्टाच्या नियमाप्रमाणें कोणत्याहि खात्यांत ६ वर्षांपेक्षा अधिक काळ पैशाची काढठेव झाली नाहीं तर तें निद्रिस्थ खातें समजण्यांत येतें. पण ह्याचा अर्थ तीं खातीं रद्द झालीं असा नाहीं. हिशेबाच्या सोयीसाठीं आणि लबाडी करणें शक्य होऊं नये म्हणून ह्या खात्यांना निद्रिस्थ असें म्हणण्याची पद्धत आहे. खात्यांतील रकम गोठविण्याचा प्रश्नच नाहीं.

**युरेनियम निर्मितीचा कारखाना**—बिहार राज्यांत युरेनियमचें उत्पादन करणाऱ्या एका कारखान्याच्या उभारणीचें काम चालू आहे. तें काम आतां पूर्ण होत आलें असून पुढील वर्षाच्या आरंभीं कारखान्यांत उत्पादन चालू करण्यांत येईल. त्याच्या उभारणीसाठीं ४·३ कोटी रुपये भांडवल लागलें आहे. परदेशीय तज्ज्ञांची कोणतीहि मदत न घेतां हिंदी तंत्रज्ञच कारखान्याची उभारणी करीत आहेत. यंत्रसामग्रीची व साधनांची मागणी नोंदण्यांत आली आहे.

**धान्याच्या कायदेशीर वांटपाचा खर्च**—भारतांत लाखावर लोकवस्ती असणाऱ्या शहरांतून कायदेशीर शिधावांटप पद्धति अमलांत आणण्यासाठीं दरसाल २५ कोटी रुपये खर्च करावा लागेल. शिधावांटप अमलांत आल्यावर सुमारें १० कोटी लोकांचा ह्या पद्धतींत समावेश होईल. राज्यांच्या मुख्य मंत्र्यांच्या मतानें हा सर्व खर्च मध्यवर्ती सरकारनें सोसावा. वांटपाची यंत्रणा उभारण्यासाठीं दरडोई २·५ रुपये खर्च येईल.

**नेवेली विद्युतकेंद्राचा विस्तार**—नेवेली येथील उष्णता निर्मित विद्युतकेंद्राचा विस्तार करण्यासंबंधीचा रशियन तंत्रज्ञांचा अहवाल येत्या नोव्हेंबरमध्यें हातीं येईल. विस्ताराचें काम पूर्ण झाल्यावर ह्या केंद्रांतून उत्पन्न होणारी वीज ६०० मेगॅवॅट इतकी होईल; सध्यां केंद्राची उत्पादनक्षमता ४०० मेगॅवॅट आहे. विस्ताराच्या कामाचे नकाशे आणि आराखडे ह्यांचा खर्च रशिआनें १९५९ सालीं दिलेल्या कर्जातून करण्यांत येणार आहे. आतांपर्यंत केंद्रांत ५० मेगॅटन वीज निर्माण करणारे ५ संच बसविण्यांत आले आहेत.

**चीन अणुबाँब करीत राहणार**—कुआलालंपूर येथें बोलतांना चीनच्या प्रमुख वरिष्ठ अधिकाऱ्यानें असें जाहीर केलें, कीं चीन नवे अणुबाँब बनवून त्यांची चांचणी घेण्याचें चालू ठेवणार आहे. अणुबाँबचें तंत्र अधिक सुधारण्यासाठीं अशा चांचण्यांची आवश्यकता आहेच. पण अणुबाँबपेक्षाहि अधिक शक्तिशाली अस्त्रें शोधून काढण्याचा चीनचा इरादा आहे. अणुयुद्धाला विरोध करणाऱ्यांची भीति चीनला समजते. पण त्यांनीं घाबरण्याचें कारण नाहीं. चीनचा अणुबाँब शांततारक्षणाचें एक साधन आहे, असेंहि तो म्हणाला.


JUMP UP !

*INTEREST RATES*

BELGAUM BANK

* 4% ( Four P. C. ) on **Savings Bank Accounts.**

** 6% ( Six P. C. ) on **Cumulative Deposits** for five years.

*** 7½% ( Seven and a half P. C. ) on **Fixed Deposits** for five years.

**Enquire with any of our 38 branches**

# The Belgaum Bank Limited

**( Ested. 1930 : Sch. Bank )**

Registered Office : **659-60, Raviwar Peth, Belgaum.**

Bombay Branch : **259-63, Narsinath Street, Mandvi, Bombay-9**

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २

म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरें करोनि प्राप्त ।
तें कर्म हेतुरहित । आचर तूं ॥ — श्रीज्ञानेश्वरी

## स्वतंत्र भारत चिरायु होवो !

**स्वातंत्र्यदिनाच्या मंगल प्रसंगीं आमच्या सर्व भागीदार, ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !**

बृहन्महाराष्ट्रांतील मध्यम वर्गानें गुंतविलेल्या भांडवलावर यशस्वी रीतीनें चालू असलेला हा साखर स्पिरीटचा कारखाना मध्यम वर्गीयांचें भूषण होय !

**गो. श्री. वाळिंबे**, बी. कॉम.
ऑफिशिएटिंग मॅनेजर.

**शं. ल. लिमये**, बी. एस्सी., एलएल. बी.,
अध्यक्ष

# अर्थ

बुधवार, १८ ऑगस्ट, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### ग्रामीण भागांतील लोकांचें निकृष्ट उत्पन्न आणि आर्थिक विषमता

व्यावहारिक आर्थिक संशोधनाच्या राष्ट्रीय मंडळानें ग्रामीण भागांतील कुटुंबांच्या उत्पन्नाची नमुना पाहणी करून एक अहवाल तयार केला आहे. ह्या अहवालांतील माहितीवरून ग्रामीण भागांतील लोकांच्या निकृष्ट उत्पन्नाची चांगली कल्पना येते. भारतामधील २५ कोटी लोक दररोज अवघे ६८ पैसे मिळवितात आणि आणखी १० कोटी रोज अवघे ४२ पैसे मिळवितात, असें पाहणी मंडळाला आढळून आलें. ५ कोटी लोकांचें दरडोई उत्पन्न ३२ पैसे आहे, तर आणखी १ कोटी लोकांचें दरडोई उत्पन्न २७ पैसे आहे. १९६१ सालीं झालेल्या शिरगणतीप्रमाणें ज्या भागांतील लोकसंख्या १० हजारांपेक्षा कमी होती अशा ३२ ठिकाणच्या ८६५ घरांची पाहणी अहवाल तयार करण्यासाठी करण्यांत आली होती. ह्या पाहणीवरून निघालेले निष्कर्ष बोधप्रद आहेत. ग्रामीण भागांत उत्पन्नाच्या वांटणीत बरीच विषमता दिसून येते. ग्रामीण समाजांतील अगदी वरच्या थरांतील १ टक्का लोकांचें उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या ९ टक्के असलेलें आढळून आलें. तळाच्या थरांतील ६० टक्के लोकांचें उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या ३१ टक्के होतें आणि वरच्या थरांतील ४० टक्के लोकांचें उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या ६२ टक्के होतें. ही आर्थिक विषमता संपत्तीच्या मालकींत विशेषच दिसून येते. ग्रामीण भागांतील लोकांचा अजूनहि सोन्याकडे व चांदीकडे जोराचा ओढा आहे. १९६४ सालीं ग्रामीण भागांतील घरांत असणाऱ्या मालमत्तेंत १४८ कोटी रुपयांच्या मालमत्तेची भर पडली. ह्या वाढलेल्या मालमत्तेपैकी जवळजवळ एक चतुर्थांश रुपयांची मालमत्ता सोन्याच्या व चांदीच्या रूपांत होती. १९६२ सालीं ग्रामीण घरांचें सर्व प्रकारचें उत्पन्न जवळजवळ ८,७२६ कोटी रुपये होतें. दरमाणशी दरडोई सालीना २४७ रुपये असें हें प्रमाण पडतें. ग्रामीण भागांतील लोक शेती आणि तत्संबंधीं इतर व्यवसाय ह्यांच्यांतच गुंतलेले होते.

---

### तांत्रिक शिक्षणशाळांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं.

माध्यमिक शाळांतून दिल्या जाणाऱ्या पुस्तकी शिक्षणांत विविधता आणण्यासाठी आणि तांत्रिक शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी तांत्रिक शिक्षणाच्या शाळा उघडण्यांत आल्या आहेत. औद्योगिक क्षेत्रांत लागणारे खालच्या पातळीवरील कुशल कामगार मिळत नाहींत अशी तक्रार उद्योगपतींकडून नेहमीच करण्यांत येते. उद्योगधंद्यांतील ही उणीव दूर करण्याच्या कामीं तांत्रिक शाळांची मदत होऊं शकेल अशी अपेक्षा होती. परंतु ती फारशी फलद्रूप झालेली नाहीं. तांत्रिक शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पुरा झाल्यावर ते औद्योगिक संघटनांतून कामें करूं लागतील अशी अपेक्षा होती. नियोजन समितीनें ह्या विषयासंबंधीं पाहणी केली असतां असें आढळून आलें, कीं तांत्रिक शाळांतील अभ्यासक्रम पुरा केलेल्या विद्यार्थ्यांपैकी अवघे १८ टक्के विद्यार्थीच औद्योगिक संघटनांतून रोजगार करण्यास जातात. ह्याचाच अर्थ असा कीं, तांत्रिक शाळांतील शिक्षणाच्या फार मोठ्या सोयी-सवलती फुकट जातात. शिक्षणाचा विकास करण्यासाठी लागणारा पैसा अपुरा पडत असतांना इतक्या मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक सोयी वाया जाव्यात ही गोष्ट चिंतनीयच म्हटली पाहिजे. तांत्रिक शिक्षणाच्या सोयी वाया जाण्याचा हा एकच मार्ग नाहीं. अभ्यासक्रम अर्धवट सोडून दिलेल्या विद्यार्थ्यांचा आणि अयशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचाहि ह्यांतच समावेश केला पाहिजे. १९६०–६१ व १९६१–६२ ह्या वर्षांत एकूण ३,२२१ विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाच्या शाळांत प्रवेश देण्यांत आला होता. त्यापैकी २,०८० विद्यार्थ्यांनीं शिक्षणक्रम पुराच केला नाहीं. म्हणजे ६४·६ टक्के विद्यार्थ्यांचा वेळ व खर्च वाया गेला. ७ राज्यांतील ३९ तांत्रिक शाळांतन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यास करून ही पाहणी करण्यांत आली होती. ह्या शाळांतून शिकण्यासाठी येणारे विद्यार्थी बहुधा सामान्य किंवा त्याहीपेक्षा बेताच्या बौद्धिक पात्रतेचे असतात, असेंहि पहाणींत आढळून आलें आहे.

---

### चौथ्या कार्यक्रमांत शेतीवर अधिक भर

महाराष्ट्र राज्याच्या चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शेतीच्या विकासाला प्राधान्य देण्यांत येणार आहे, असें अर्थमंत्री श्री. वानखेडे ह्यांनीं अमरावती येथें बोलतांना सांगितलें. ते म्हणाले, कीं चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १,१८५ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. त्यांपैकी २४६ कोटी रुपये शेतीवर खर्च करण्यांत येतील. तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम ४,१८८ कोटी रुपयांचा होता व त्यांतील ७० कोटी रुपयेच शेतीवर खर्च करण्यांत आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर महाराष्ट्रांतील अन्नधान्याचें उत्पादन ६०·३८ लाख टन होतें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस तें ७७ लाख टन होईल असा अंदाज आहे. १९७०–७१ हें साल चौथ्या पंचवार्षिक योजनेंतील अखेरचें आहे. त्यासाठी ९९ लाख टन अन्नधान्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. उद्दिष्ट साध्य करण्यांत यश आलें तर महाराष्ट्र राज्याला येणाऱ्या अन्नधान्याच्या तुटीपैकीं ८० टक्के तूट भरून येऊं शकेल.

---

### बँका कमी झाल्या, पण शाखा वाढल्या

शेड्यूल्ड आणि बिगर–शेड्यूल्ड बँकांची संख्या कमी होत गेली असली, तरी शाखांची संख्या मात्र वाढली आहे. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची संख्या १९४९ ते १९६४ ह्या मुदतींत १५८९ ची ४१२ वर उतरली, पण शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची संख्या २८५२ ची ५४७८ झाली. त्यामुळें १९४९–६४ ह्या मुदतींत एकूण १४४९ शाखांची भरच पडली. बिगर–शेड्यूल्ड बँकांची संख्या ५२६ ची ८० वर उतरली आहे! शेड्यूल्ड बँका ९४ होत्या, त्या आतां ७६ आहेत. पुढील तक्त्यांत ही परिस्थिति तपशीलवार स्पष्टपणें दिसून येईल:—

### बँका आणि त्यांच्या शाखा

| | शेड्यूल्ड बँका | | बिगर-शेड्यूल्ड बँका | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | बँका | शाखा | बँका | शाखा | बँका | शाखा |
| १९४९ | ९४ | २८५२ | ५२६ | १५८९ | ६२० | ४४४१ |
| १९५० | ९१ | २७६५ | ५१४ | १५४५ | ६०५ | ४३१० |
| १९५१ | ९२ | २६४७ | ४८६ | १५०४ | ५७८ | ४१५१ |
| १९५२ | ९१ | २६७१ | ४४० | १३६९ | ५३१ | ४०४० |
| १९५३ | ८९ | २६७० | ४३२ | १३५१ | ५२१ | ४०२१ |
| १९५४ | ८८ | २७४६ | ४१० | १२८६ | ४९८ | ४०३२ |
| १९५५ | ८९ | २८३८ | ३८५ | १२४७ | ४७४ | ४०८५ |
| १९५६ | ८९ | २९५३ | ३३३ | १२४० | ४२२ | ४१९३ |
| १९५७ | ९१ | ३२५३ | २९८ | ११२२ | ३८९ | ४३७५ |
| १९५८ | ९३ | ३६२३ | २७८ | ९८२ | ३७१ | ४६०५ |
| १९५९ | ९४ | ३९२२ | २६५ | ९२५ | ३५९ | ४८४७ |
| १९६० | ९३ | ४१४२ | २५१ | ८८५ | ३४४ | ५०२७ |
| १९६१ | ८२ | ४३८८ | २०९ | ७२५ | २९१ | ५११३ |
| १९६२ | ८० | ४६०६ | १९६ | ६५४ | २७६ | ५२६० |
| १९६३ | ७९ | ५००२ | १६९ | ५७१ | २४८ | ५५७३ |
| १९६४ | ७६ | ५४७८ | ८० | ४१२ | १५६ | ५८९० |
| फरक | | | | | | |
| १९४९-६४ | –१८ | +२६२६ | –४४६ | –११७७ | –४६४ | +१४४९ |
| १९५३-६४ | –१३ | +२८०८ | –३५२ | – ९३९ | –३६५ | +१८६९ |

### इथिओपिआंत प्लॅस्टिकच्या वस्तूंचा कारखाना

इथिओपिआंत प्लॅस्टिकच्या वस्तु तयार करण्याचा एक कारखाना भारताच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे. कारखाना उभारण्यासाठी इथिओपिआंत एका कंपनीची स्थापन करण्यांत येईल. कलकत्ता येथील डंकन ब्रदर्स अँड कंपनी ही संघटना इथिओपिआंतील कंपनीचे ३ लाख रुपयांचे साधारण भाग घेणार आहे. कंपनीचें एकूण भांडवल १० लाख रुपये साधारण भागांचें असेल. कारखाना उभारण्यासाठी भारत यंत्र-सामग्री, इमारतीच्या बांधकामाचें सामान, इत्यादी स्वरूपांत मदत करणार आहे. कारखान्याचा कारभार तो स्थापन झाल्यापासून १५ वर्षांपर्यंत हिंदी संचालकांकडे राहणार आहे. इथिओपिआंत भारताच्या मदतीनें उभारण्यांत येणारी ही दुसरी औद्योगिक संघटना आहे. ह्यापूर्वी डंकन कंपनीच्या सहकार्यानेच तेथें एक लोकरीच्या कापडाची गिरणी काढण्यांत आली आहे.

### सुरतगड येथील यांत्रिक शेतवाडींत पूर

राजस्थानांत रशियाच्या मदतीनें ३० हजार एकर जमिनींत यांत्रिक शेतवाडी स्थापन करण्यांत आली आहे. परंतु ह्या शेतीला घग्गर नदीच्या पुराच्या पाण्यामुळें गेलीं दोन वष धोका पोंचला आहे. शेतवाडीच्या जमिनींपैकी अर्ध्या म्हणजे १५ हजार एकर जमिनीला नदीला आलेल्या पुराचा तडाखा बसला आहे. गेल्या वर्षी तर २४ हजार एकर जमीन पाण्याखालीं जाऊन त्यावर असलेलीं २४ लाख रुपयांचीं उभीं पिकें नष्ट झालीं. ह्या वर्षी वाडींतील ५ वसाहतींपैकी ४ वसाहती पाण्यानें वेढल्या गेल्या होत्या. नदीच्या पाण्याला एके ठिकाणी बंधारा घातल्यामुळें ह्या वर्षी फळबागांचें मात्र नुकसान झालें नाहीं. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत पुराच्या पाण्याचा निचरा झाला नाहीं तर वाडींत रबीचीं पिकें घेतां येणार नाहींत, असें वाडींतील यंत्रविभागाच्या प्रमुखाचें मत आहे.

ठाकरसी फॅब्रिक्स
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड •SANFORIZED•
THACKERSEY FABRICS
ठाकरसी शर्टिंग म्हणजे रुबाबदार कापड
डिझाइनचे किंवा साधे, हवी त्याची करा निवड
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स •श्री क्राउन स्पिनिंग ॲन्ड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.
•श्री इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •श्री हिंदुस्तान स्पिनिंग ॲन्ड वीव्हिंग मिल्स कं. लि.




BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

## नवीन रेल्वे झोन्स : विकेंद्रीकरणास गति

नवव्या रेल्वे झोनच्या सिकंदराबाद येथील कचेरीच्या इमारतीच्या पायाचा दगड रेल्वेमंत्री श्री. स. का. पाटील ह्यांच्या हस्तें बसविण्यांत आला. त्या वेळीं भाषण करतांना दहाव्या रेल्वे झोनचा उल्लेख त्यांनीं केला. वेस्टर्न आणि नॉर्दर्न रेल्वेजच्या राजस्थान आणि गुजरात ह्या राज्यांत मुख्यतः असलेल्या मीटरगेज विभागांचा त्या झोनमध्यें मुख्यतः समावेश होणार आहे. १९५२ सालीं हिंदी रेल्वेजची वेगवेगळ्या गटांत विभागणी केली होती, ती अव्यवहार्य ठरून पूर्वीच्या पद्धतीकडे ही वाटचाल आहे. त्या वेळीं ईस्टर्न, वेस्टर्न, नॉर्दर्न, नॉर्थ ईस्टर्न, सदर्न आणि सेंट्रल रेल्वेजमध्यें सर्व आगगाडीचे रस्ते वांटून दिले होते. पूर्वीच्या कंपनी आणि सरकारी रेल्वेजचें कार्यक्षेत्र ऐतिहासिक कारणांमुळें निर्माण झालेलें म्हणून कृत्रिम होतें. त्यांतील कांहीं कारभाराच्या दृष्टीनें फारच लहान होत्या. सर्व रेल्वे मैल सहा गटांत विभागले म्हणजे कारभारांत कार्यक्षमता येईल, अशी कल्पना! पण पुढें आढळून आलें, कीं कांहीं गट कारभाराच्या दृष्टीनें फारच मोठे आहेत. प्रादेशिक प्रश्न आणि अडचणी सोडविण्यास ते असमर्थ होते. ह्या पुनर्रचनेला पहिला सुरुंग लागला १९५५ सालीं; तेव्हां ईस्टर्न रेल्वे अशी विभागणी करण्यांत आली; साउथ ईस्टर्न रेल्वेकडे पूर्वीच्या बेंगाल नागपूर रेल्वेचा भाग एकत्रित आला. १९५८ सालीं सरकारनें आसाम आणि उत्तर बंगाल व विहार ह्यांचा कांहीं भाग, ह्यासाठी नॉर्थ ईस्ट फ्रॉंटियर रेल्वे विभाग निर्माण केला; जुनी आसाम रेल्वे पुनः त्यांतून निर्माण झाल्यासारखी झाली. हा आठवा झोन होय. नववा झोन म्हणजे साऊथ सेंट्रल झोन; त्याच्याच कचेरीची इमारत सिकंदराबाद येथें बांधण्यांत येत आहे. त्यांत जुनी निजाम स्टेट रेल्वे एकत्र येत आहे. हे असे झोन आणखीहि वाढण्याचा संभव आहे.

---

## सिमेंटअभावीं श्रीरामपूरच्या सूत-गिरणीचें बांधकाम थांबलें

कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालकीची श्रीरामपूरची सहकारी सूतगिरणी येत्या प्रजासत्ताक दिनापासून सुरू व्हावयाची आहे. तथापि सरकारकडून गरजेनुसार या योजनेच्या उभारणीसाठी सिमेंटचा पुरवठा अजिबात होत नसल्यामुळें संकल्पित योजना लांबणीवर पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

केवळ सिमेंटअभावीं ८५ते९० लक्ष रुपये भांडवलाची ही योजना निष्कारण अडून पडणार असून त्यामुळें राष्ट्रीय उत्पादनवाढीवर परिणाम होणार आहे, असें स्पष्ट मत चेअरमन श्री. थोरात यांनीं व्यक्त केलें. २५ हजार चात्यांच्या, केंद्र सरकारनें मंजूर केलेल्या येथील सहकारी सुत गिरणीच्या उभारणीसाठी २,५०० टन सिमेंटची मागणी करण्यांत आली होती. त्यांपैकीं ६९३ टन सिमेंट मंजूर झालें. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्यांपैकीं २९६ टन फक्त आतांपर्यंत सूत गिरणीस मिळालें आहे.

सिमेंटअभावीं गेल्या १-१॥ महिन्यापासून उभारणीचें काम बंद आहे. याउलट, सूत गिरणीनें दिलेल्या ऑर्डरीप्रमाणें एकूण मशिनरींपैकीं ३०० पेट्या इंग्लंडहून गिरणीच्या आवारांत येऊन दोन महिने झाले आहेत. बाकी राहिलेल्या २०० पेट्या येत्या महिनाभरांत येतील अशी अपेक्षा आहे. मशिनरी बसविण्याच्या कामास इंग्लंडहून तंत्रज्ञ येणार आहेत व तें काम साधारणपणें ६-७ महिने चालेल. ४३२ फूट लांब, १३० फूट रुंद या भव्य आकाराची मुख्य इमारत होणार आहे.

---

## देशद्रोही देशभक्त होऊं लागले!

१९४९ सालीं चीनमधील कम्युनिस्ट क्रांतिकारकांनीं राष्ट्रीय चीनच्या फौजांचा पराभव करून आपली सत्ता स्थापन केली. त्यावेळीं राष्ट्रीय चीनचे अध्यक्ष मार्शल चँग-कै-शेक आणि त्यांचे वरिष्ठ सहकारी फोर्मोसांत पळून गेले आणि तेथें त्यांनीं अमेरिकेच्या साह्यानें आपली राजवट सुरू केली. तेव्हांपासून चँग-कै-शेक व त्यांचे सहकारी ह्यांना नवे कम्युनिस्ट राज्यकर्ते देशद्रोही समजूं लागले. पण, अलीकडे लाल चीनच्या सत्ताधाऱ्यांच्या धोरणांत बदल होऊं लागल्याचीं लक्षणें दिसत आहेत. जुन्या राष्ट्रीय राजवटींतील प्रमुख पुढारी चीनच्या मुख्य भूमिवर परत आल्यास त्यांचें स्वागत करण्यांत येत असून वागणूकहि चांगली दिली जात आहे. राष्ट्रीय चीनचे एक माजी कार्यकारी अध्यक्ष चँग-कै-शेक ह्यांचा पक्ष सोडून पेकिंगला गेले आहेत. पेकिंगच्या विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी चीनचे पंतप्रधान मि. चौ-एन-लाय जातीनें हजर होते! ह्या लोकांना देशद्रोही म्हणून गणून त्यांचीं मनें वळवितां येणार नाहींत, अशी कम्युनिस्ट चीनची नवी धारणा आहे. त्याऐवजीं त्यांना चांगली वागणूक देऊन परत आणतां आले तर पाहावें असा प्रयत्न सुरू करण्यांत आला आहे. थोडक्यांत म्हणजे, जे लोक राष्ट्रीय पक्षाचें असल्यामुळें पूर्वी देशद्रोही गणण्यांत येत होते, तेच आतां देशभक्त म्हणून सन्मानिले जात आहेत. कांहीं दिवसांपूर्वी चीननें दुसऱ्या अणुबाँबचा स्फोट केला. चीनच्या अणुशास्त्राची प्रगति साधण्याचें काम अमेरिकेहून परत चीनला आलेल्या एका शास्त्रज्ञाकडे सोपविण्यांत आलें आहे, असें म्हणतात. कर्तबगार चिनी लोकांचा उपयोग करून घेण्यासाठी हें नवें धोरण स्वीकारण्यांत आलें असावें. शिवाय, त्यामुळें चँग-कै-शेक ह्यांच्या पक्षाचें उरलें सुरलें वजनहि संपुष्टांत येईल. राजनीति ही वारांगनेसारखी असते असें वचनच आहे. चिनी राज्यकर्त्यांनीं ह्या वचनाचा सार्थपणा दाखवून दिला आहे.

---

## भारतांतील जननाचें भारी प्रमाण

भारतांतील जननाचें प्रमाण वार्षिक ४% आहे. मृत्यूचें प्रमाण खूप सालीं येऊन तें वार्षिक १·५% झालें आहे. ह्याचा अर्थ, लोकसंख्येच्या वाढीची वार्षिक गति २·५% आहे. जननाचें प्रमाण ४% चे २% वर आणणें आवश्यक आहे. मृत्यूचें प्रमाण १·५% कायम राहिलें तर मग लोकसंख्येंत ½% वाढ होईल. भारतांतील जननाचें प्रमाण इतर देशांच्या तुलनेनें कितीतरी जास्त आहे.

---

### वेगवेगळ्या देशांतील जननाचें प्रमाण

| देश | दर हजारीं जननाचें प्रमाण |
|---|---|
| इंग्लंड | १६ |
| जपान | १७ |
| इटली, स्वित्झरलंड | १८ |
| फ्रान्स, झेकोस्लोव्हाकिया | १९ |
| आयर्लंड, बल्गेरिया | २० |
| ऑस्ट्रेलिया | २३ |
| अमेरिका | २५ |
| पोलंड, युगोस्लाव्हिया | २८ |
| कॅनडा | २९ |
| चिली | ३४ |
| भारत | ४० |

## नजीकच्या काळांत महाराष्ट्रांत दुधाचा तीव्र दुष्काळ जाणवेल !

महाराष्ट्रांत दुधाची टंचाई मोठ्या प्रमाणावर जाणवत असून योग्य पाऊल न उचलल्यास नजिकच्या काळांत दुधाचा मोठा दुष्काळ पडल्याविना राहणार नाहीं, असा इषारा केंद्र सरकारचे समाजविकास खात्याचे संसदीय सचिव ना. अण्णासाहेब शिंदे यांनीं एका पत्रकान्वयें दिला आहे.

श्री. शिंदे आपल्या पत्रकांत म्हणतात, "देशांत व प्रामुख्यानें महाराष्ट्रांत आजकाल मोठ्या प्रमाणांत दुधाचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्याची झळ ग्राहकांना फार मोठ्या प्रमाणांत लागत आहे. मोठ्या शहरांत व ग्रामीण भागांतहि सकस आहाराच्या दृष्टीनें मुलांना व प्रौढांना शुद्ध दूध मिळणे ही आज जवळजवळ दुर्मिळ गोष्ट झाली आहे."

"गेल्या तीन पंचवार्षिक योजनांत भारत सरकारनें व निरनिराळ्या राज्य सरकारांनीं अनेक ठिकाणीं मोठमोठी यंत्र-सामग्री बसवून दुधावर प्रक्रिया करणारीं दुग्धालयें उघडलीं आहेत. परंतु देशांतील बहुसंख्य डेअरींना हल्लीं पुरेशा प्रमाणांत दुधाचा पुरवठा होत नाहीं. देशांत गुजराथखेरीज कोठेंहि दूध योजना यशस्वी झालेल्या दिसत नाहींत. महाराष्ट्रांत तर दुग्धव्यवसायाची परिस्थिति अतिशय केविलवाणी आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतील मोठ्या शहरांतून ग्राहकांना हल्लीं खाजगी रीतीनें दीड रुपया लिटर किंवा त्याहिपेक्षा अधिक किंमत देऊन दूध घ्यावें लागत आहे. तेंहि शुद्ध असतेंच असें नाहीं व त्याहि भावांत मिळण्याची शाश्वति नसते.

"दुधासारख्या शेतीस पूरक असणाऱ्या व्यवसायासंबंधीं निश्चित व स्पष्ट धोरणाचा अवलंब केल्याशिवाय पूरक अन्न पुरवठा प्रश्न सुटूं शकणार नाहीं. यापुढें दूध उत्पादनाचे व वितरणाचे तदनुषंगिक प्रश्न सरकारी क्षेत्राऐवजीं सहकारी क्षेत्रावरच सर्वस्वीं सुपूर्द केले पाहिजेत. आजच्या परिस्थितींत सहकारी संघटना ग्रामीण पातळीपासून राज्यपातळीपर्यंत उभारून पशुसंवर्धन, प्रजनन, दूध उत्पादन व वितरण हें सर्वस्वीं सहकारी क्षेत्रांतच करण्याचा स्पष्ट निर्णय तांतडीनें घेणें जरूरीचें झालें आहे. आरे कॉलनी किंवा दापचारी पद्धतीवर विसंबून राहून महाराष्ट्रांतील दूध प्रश्न कधींच सुटणार नाहीं.

त्यांनीं कित्येक सूचनाहि केल्या आहेत. त्यांत सहकारी बँकांवर २५% आपला पैसा दूध, कुक्कुटपालन, इत्यादि पशु-संवर्धनाच्या धंद्यांत गुंतविण्याचें बंधन असावें, अशी एक सूचना आहे.

---

## इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.

वरील बँकेनें आपल्या पहिल्या तीन वर्षातच खूप प्रगति केली आहे. शेअर भांडवल २,६१,२०० रु. झालें असून रिझर्व्ह व इतर फंड ३९,८५० रु. चे आहेत. ठेवी ९,६०,००० रु. च्या असून गेल्या वर्षीचा निव्वळ नफा ४९,६६४ रु. आहे. येणें कर्जें सुमारें ६ लक्ष रु. चीं असून त्यापैकी थकबाकी कांहींहि नाहीं. बँकेनें कर्जदारांना द्यावयाच्या रकमेंतून शेंकडा ५ टक्के रक्कम सक्तीची बचत म्हणून मुदत ठेवीनें ठेवण्याची योजना १-७-६५ पासून सुरू केली आहे. स्थानिक हुंडी व परपेठ हुंडी खात्यांसहि ही योजना लागूं आहे. मंजूर रकमेच्या ५% ऐवजीं १०% रक्कम ठेव म्हणून ठेवून घेण्यांत येत आहे. एक महिन्याच्या अवधींत अशा रीतीनें दीड लक्ष रुपये ठेव जमा झाली आहे.

[ चेअरमन: कल्लाप्पा बापुराव आवाडे; व्हाइस चेअरमन: शंकरराव रामचंद्र हुपरे; मॅनेजर: रामदास पुंडलिक कुलकर्णी ]


सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.


| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १०·२२ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५·७८ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४४३·६२ ,, |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४८१·१५ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग




तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंपस्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

### समुद्रांत दडलेली अमाप संपत्ति

पुराणांतील देवदानवांनीं केलेल्या समुद्रमंथनाची कथा प्रसिद्धच आहे. त्यांनीं केलेल्या कष्टामुळें त्यांना १४ रत्नांचा लाभ झाला; म्हणजेच खूप संपत्ति मिळाली असें सांगतात. आधुनिक शास्त्रीय युगांतहि निराळ्या साधनांनीं एक प्रकारचें समुद्रमंथन चालूंच आहे. लेनिन पारितोषिक मिळविणाऱ्या एका रशिअन शास्त्रज्ञानें समुद्रांत दडलेल्या संपत्तीची माहिती सांगितली आहे. त्याच्या मतानें पृथ्वीवरील महासागरांच्या पाण्यांत कल्पनाहि येणार नाहीं इतकी रासायनिक संपत्ति आहे. त्यांत सोनें, चांदी, निकेल, ह्यासारखे परिचित धातू तर आहेतच; पण त्याशिवाय कोबाल्ट, मोलिब्डेनम् ह्यासारखीं क्वचित् आढळणारीं व अत्यल्प प्रमाणांत सांपडणारीं खनिजेंहि आहेत. जगांतील महासागरांत १४० कोटी घन किलोमीटर पाणी असावे असा हिशोब करण्यांत आला आहे. समुद्राच्या प्रत्येक लिटर पाण्यांत ३५ ग्रॅम तरी क्षार खनिजें असतात. ह्या हिशोबानें समुद्राच्या पोटांत ८० लाख टन सोनें, ८ कोटी टन निकेल, ८० कोटी टन मोलिब्डेनम् आणि १६·४ कोटी टन चांदी असावी असें निष्पन्न होतें. शिवाय समुद्राच्या तळाचे कांहीं भाग लोह आणि मॅंगेनीज-मिश्रित खडकानेंच व्यापलेले आहेत. येत्या कांहीं वर्षांत जगांतील फार मोठ्या भागावर भीषण दुष्काळ पडणार असल्याचें भाकित आंतरराष्ट्रीय कीर्तिचे अर्थशास्त्रज्ञ करीत आहेत. अन्नपदार्थांची टंचाई दूर करण्याच्या कामीं समुद्राचें चांगलें साह्य होईल असें सांगण्यांत येतें. समुद्रांतर्गत प्राण्यांपासून अनेक वस्तु मिळतात. त्यांत खाण्यास योग्य अशा माशांचा अनुक्रम अर्थातच पहिला लागतो. जगांत दरसाल सुमारें ३·८ कोटी टन मासे पकडण्यांत येतात व त्यांचा खाण्यासाठी उपयोग करण्यांत येतो. पण खाण्यासाठी पकडण्यांत येणाऱ्या माशांचें प्रमाण माशांच्या एकूण संख्येशीं अगदीं थोडें म्हणजे एकदशांशच आहे. समुद्रांतून ५० कोटी टन मासे मिळूं शकण्यासारखे आहेत.

### वर्षानुवर्षें वाढत जाणारी बेकारी

भारत स्वतंत्र झाल्यापासून दोन पंचवार्षिक कार्यक्रम पुरे करण्यांत आले आणि तिसरा लवकरच पूर्ण होईल. पण ह्या कार्यक्रमांनीं बेकारांची संख्या मात्र कमी झालेली नाहीं. उलट प्रत्येक कार्यक्रमाच्या अखेरीस ती वाढतच चाललेली आहे. नव्या रोजगारांची जरूरी आणि प्रत्यक्ष उपलब्ध होणारे रोजगार ह्यांच्यांतील अंतर रुंदावत चाललेलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत नव्या रोजगारांच्या निर्मितीचें जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें त्यापेक्षा प्रत्यक्ष रोजगारांची उपलब्धता १० लाखांनीं कमी पडेल असा अंदाज करण्यांत आला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभीं बेकारांची संख्या ८० लाख असावी. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत काम करण्यास योग्य असे १·७ कोटी धट्टेकट्टे लोक रोजगारबाजारांत आले असावेत. ह्या कार्यक्रमांत १·४ कोटी लोकांना रोजगारी देण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. पण प्रत्यक्ष १·३ कोटी लोकांनाच रोजगारी मिळण्याचा संभव आहे.

### स्टेट बॅंकेच्या ३० हजार नोकरांना २७ लक्ष रुपये वाढ

स्टेट बॅंक ऑफ इंडियानें आपल्या कारकुनी व कनिष्ठ नोकरवर्गाला पगारवाढ जाहीर केली आहे. तिचा ३०,००० नोकरांना फायदा मिळेल. ह्या पगारवाढीमुळें बॅंकेचा वार्षिक खर्च २७ लक्ष रुपयांनीं वाढेल.

### ब्रिटनमध्यें स्थलांतर करणाऱ्यांच्या संख्येवर मर्यादा

ब्रिटनच्या सरकारनें कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतून ब्रिटनमध्यें कायमचें स्थलांतर करून येणाऱ्या लोकांच्या संख्येवर नियंत्रण घालण्याचें ठरविलें आहे. दरसाल फक्त १० हजार लोकांना ब्रिटनमध्यें कायमचें म्हणून येतां येईल, असें राष्ट्रगटांतील देशांना कळविण्यांत आलें आहे. ब्रिटनमध्यें स्थायिक होण्यासाठी येणाऱ्यांपैकी बहुतेक लोक भारत, पाकिस्तान आणि वेस्ट इंडीजमधील असतात. येणाऱ्या लोकांची वैद्यकीय परीक्षा अधिक कडक रीतीनें करण्यांत यावी आणि ब्रिटनमध्यें आल्यावर नोकरी मिळण्याची निश्चिती असल्याचा पुरावा त्यांनीं सादर केला पाहिजे अशा अटी घालण्यांत आल्या आहेत. ब्रिटनमध्यें आलेल्या परदेशीय नागरिकांच्या विरुद्ध तेथील लोकमत होऊं लागलें आहे. आर्थिक कारणामुळें उत्पन्न होत असलेल्या ह्या विरोधाला कधीं कधीं वांशिक द्वेषाचें स्वरूपहि प्राप्त होत असतें.

### पूर्व भारतांतील वाहतुकीच्या साधनांची पाहणी

पूर्व भारतामधील सर्व प्रकारच्या वाहतुकीच्या साधनांची पाहणी करण्यांत येणार आहे. हें काम भारत सरकार आणि जागतिक बॅंक मिळून करणार असून, त्यासंबंधींची आर्थिक जबाबदारीहि सोसणार आहेत. चौथ्या व पांचव्या पंचवार्षिक योजनेंत ह्या भागांतील वाहतुकीची सुधारणा घडवून आणण्यासाठी काय खर्च येईल त्याचा अंदाज लागल्यावर ह्या कामासाठी भांडवलगुंतवणुकीचा कार्यक्रम तयार करण्यांत येईल. पाहणी नियोजन-समिति करणार आहे. समितीला मदत करण्यासाठी अमेरिका आपलें एक तज्ज्ञांचें मंडळ धाडणार असून, त्या मंडळाचा २ लाख, ८५ हजार डॉलर्सचा खर्च स्वतः करणार आहे. रुपयांच्या चलनांतील खर्च भारत सरकार करील. वाहतुकीच्या साधनांच्या पाहणींत पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा आणि मध्यप्रदेश व आंध्र प्रदेश ह्यांमधील कांहीं सरहद्दीवरील जिल्ह्यांचा समावेश करण्यांत येईल. भारताच्या पूर्व भागांतच अवजड उद्योगधंदे केंद्रित झालेले असल्यामुळें ह्या पाहणीला विशेष महत्त्व आहे.

### वनस्पतींच्या उद्यानाला स्वतःचें घर

कलकत्ता येथें देशांतील वनस्पतींचें एक राष्ट्रीय उद्यान स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी ४० लाख रुपये खर्च येणार आहे. उद्यानांत बोटॅनिकल सर्व्हेनें १८८३ पासून जमविलेल्या अनेक वनस्पतींचा संग्रह करण्यांत येईल आणि येत्या ५० वर्षांत जमविण्यांत येणाऱ्या वनस्पतींचीहि सोय करण्यांत येईल. भारतामधील वनस्पतींची संपत्ति विपुल आहे. परंतु एकूण वनस्पतींपैकीं दोन तृतीयांश वनस्पतींची शास्त्रज्ञांना माहिती नाहीं. अर्थातच त्यांच्या उपयोगाचें ज्ञानहि नाहीं. वनस्पतींपैकी व्यापारी दृष्टीनें अगर औषधी दृष्टीनें उपयुक्त असलेल्या वनस्पतींवरच फक्त संशोधन करण्यांत आलेलें आहे. इतर अनेक प्रकारच्या वनस्पतींकडे दुर्लक्ष झालेलें आहे. त्याशिवाय उपकरणांची, शास्त्रीय नियतकालिकांची आणि चांगल्या वाचनालयांची उणीवहि आहेच.

**विरोधी पक्षपुढाऱ्याला मेहनताना**—पाकिस्तान राष्ट्रीय विधिमंडळांत विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याला मेहनताना देण्यास मंजुरी देणारें बिल मांडण्यात आलें होतें. त्यास आतां मंजुरी मिळाली आहे. बिलांत केलेल्या तरतुदीप्रमाणें विरोधी पक्षपुढाऱ्याला दरमहा २,००० रुपये तनखा मिळणार आहे. तनख्याशिवाय राहण्यासाठी बंगला व एक मोटारगाडी मिळावयाची आहे.

### स्वनातीत विमानांची इजिप्तमध्यें निर्मिति

संयुक्त अरब प्रजासत्ताक सरकारनें स्वनातीत वेगानें जाणाऱ्या विमानांच्या बांधणीचें काम कोठल्याहि अडचणींना दाद न देतां चालू ठेवलें आहे. विमानांची बांधणी झाल्यावर त्यांची चांचणी घेण्यासाठी भारत वैमानिक पाठविण्याची शक्यता आहे. विमानें बांधण्याच्या कारखान्यांचा इजिप्शिअन एंजिनिअर आणि सरकार ह्यांच्यामध्यें मध्यंतरीं कांहीं वाद उत्पन्न झाला होता. हा इंजिनिअर बांधणीच्या कामांत भलताच नफा घेतो असें सरकारचें म्हणणें होतें. अखेर सरकारनें त्याला कामावरून दूर केलें आणि कारखान्यांत काम करीत असलेल्या ३५० परदेशीय तंत्रज्ञांपैकी १५० तंत्रज्ञांबरोबर नव्यानें करार केले. कारखान्यांतील बहुतेक तंत्रज्ञ जर्मन आहेत. भारतांत बांधल्या जाणाऱ्या एच. एफ. २४ ह्या विमानाच्या बांधणीच्या कामांतहि जर्मन एंजिनिअर्सचें साह्य मिळण्यासारखें आहे.

### तयार कपड्यांच्या निर्गतींत खूपच वाढ

भारतान १९६४ मध्यें १८९·३ लक्ष रु. किमतीच्या तयार कपड्यांची निर्गत केली. १९६२ मधील तत्सम निर्गत १६·९ लक्ष रुपये किमतीची होती. एकट्या "ब्लीडिंग मद्रास" कापडाच्या कपड्यांची निर्गत ६७·७ लक्ष रुपयांची झाली. अमेरिकेनें सर्वांत जास्त किंमतीची आयात केली; त्या खालोखाल रशिया, ग्रेटब्रिटन, वेस्टइंडिज, मध्यपूर्वेचे व आफ्रिकन देश, ह्यांनीं. मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली, आणि बंगलोर येथें तयार कपड्यांचा धंदा केंद्रित आहे; दरसाल सुमारें २० कोटी रु. चे तयार कपडे बनविले जातात. अमेरिकेंतील मोठी बाजारपेठ लक्षांत घेऊन कॉटन टेक्स्टाइल एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलनें चालू वर्षी तेथील बाजार पेठेची खास पाहणी करण्याचें ठरविलें आहे.

### स्टॉक ब्रोकर्सनीं बँकेला १० लाख रु. ला फसवलें

सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशननें कित्येक राज्यांतील स्टॉक ब्रोकर्सच्या कचेऱ्यांची झडती घेऊन कागदपत्र जप्त केले त्यावरून त्या ब्रोकर्सनीं संगनमत करून एका प्रमुख शेड्यूल्ड बँकेला १० लक्ष रुपयांना फसविलें असल्याचें निदर्शनास आलें आहे. कांहीं वर्षांपूर्वी ह्या ब्रोकर्सनीं ह्या बँकेला उत्तर प्रदेश जमीनदारी लँड बाँड्स आणि कांहीं सरकारी रोखे बाजारभावापेक्षा खूपच जास्त दरानें विकले. एकूण ४·५ कोटी रुपयांचा व्यवहार झाला आणि बँकेला १० लक्ष रुपयांचा फटका बसला. अधिक चौकशी चालू आहे. ह्या नुकसानीचा बँकेच्या व्यवहारावर परिणाम होणार नाहीं, असें समजतें.

### न्यूयॉर्क शहराचा अपुरा पाणीपुरवठा

न्यूयॉर्क शहराचें नांव घेतलें कीं, समृद्ध जीवनाचें आधुनिक प्रतीक डोळ्यापुढें उभें राहतें; पण ह्या शहराला होणारा पाण्याचा पुरवठा अपुरा आहे. गेलीं चार वर्षें ह्या भागांत अवर्षण पडल्यानें पाण्याचा प्रश्न अतिशय बिकट झाला आहे. त्यामुळें मनमोकळें स्नान करण्याचीहि पंचाईत झाली आहे. इतकेंच काय पण तृषार्त माणसाला पेला, दोन पेला पाणी पाहिजे असेल तर तेंहि मिळणें दुरापास्त झालें आहे. म्हणूनच कांहीं महिन्यांपूर्वींच शहरांतील रेस्टॉरंटमधून ग्राहकांना पाणी देण्याचें बंद करण्यांत आलें होतें. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या तळ्यांत त्याच्या क्षमतेच्या मानानें ४५ टक्केच पाणी आहे. त्यांतूनच रोज सुमारें १२५ कोटी गॅलन पाणी पुरविण्यांत येत आहे. नागरिकांनीं पाणी जपून वापरावें अशा सूचना देण्यांत आल्या आहेत.

### उद्योगपतीनें केलेलें कारखान्याचें दान

आचार्य विनोबा भावे ह्यांनीं भारतांत सुरू केलेली भूदानाची चळवळ परदेशांतहि प्रसिद्धी पावलेली आहे. ह्या चळवळीच्या यशापयशाचें मूल्यमापन वादग्रस्त होऊं शकेल. पण, संपत्तीच्या उत्पादनाच्या साधनांचें दान करण्याची ही कल्पना कांहींशी आध्यात्मिक स्वरूपाची म्हणता येईल. पश्चिम जर्मनींतील एका उद्योगपतीनें मात्र आपला कारखाना शुद्ध व्यावहारिक हेतूनें त्याच कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांना आपल्या मृत्यूनंतर दान केलेला आहे. उद्योगपति ७० वर्षें वयाचा असून त्याला संतति नाहीं आणि जवळपासचे नातेवाईकहि नाहींत. शिवाय, कारखाना नातेवाइकांना द्यावयाचा म्हटलें तर त्याला बराच कर द्यावा लागला असता. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करून त्यानें आपला १ कोटी मार्कस् अथवा ९ लाख पौंड किमतीचा कारखाना त्यांत काम करणाऱ्या ३०० कामगारांना देऊन आपला ७० वा वाढदिवस साजरा केला. व्हॅक्यूम पंप तयार करणाऱ्या ह्या कारखान्याची वार्षिक उलाढाल १·५ कोटी मार्कस् अथवा १ कोटी, ७० लाख रुपयांची होते. कारखाना ७५ वर्षें त्याच कुटुंबाच्या मालकींत चालत आलेला आहे. आपल्या निर्णयाबद्दल बोलतांना हा कारखानदार म्हणाला, कीं कारखान्यांतील कामगारच त्याचें भागभांडवल धारण करतील. त्यांच्या पगारांत वाढ होणार नाहीं. पण, भागभांडवलाचे मालक ह्या नात्यानें त्यांना उत्साहानें काम करण्यास भरपूर वाव आहे. कारण, ते जितके कष्ट करतील तितका त्यांचाच फायदा होईल. नेकीनें व अधिक काम करून आपली भरभराट करून घेण्याची आणखी दुसरी कोठली संधि त्यांना पाहिजे? कारखाना उत्तम माणसांच्या ताब्यांत जाईल ह्यांत शंका नाहीं. ज्या कामगारांबद्दल अभिमान वाटावा अशाच दर्जाचे ते आहेत. आजहि ते चांगलें काम करतात. त्यांच्याचपैकी कांहीं कामगारांचें एक विश्वस्तमंडळ नेमण्यांत आलेलें आहे. कारखाना चालविण्याचा सराव त्याना लवकर होईल, इतक्या तोलाचे ते खासच आहेत.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई — टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी : — महाल : नागपूर. — तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगांव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर (१०) माहीम ( ११ ) शीव ( १२ ) माटुंगा ( १३ ) अंधेरी.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ५,००,४३,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,४४,७४,००० |
| ठेवी | ... | ३०,९०,२५,००० |
| खेळतें भांडवल | ... | ७९,७७,१५,००० |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. — वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.


**दारिद्र्याची अधिक वाढ होणार**—संयुक्त राष्ट्र संघटनेनें १९६१ ते १९७० हें दशक विकासाचें दशक म्हणून मानलें आहे. ह्या विकासदशकासंबंधीं संघटनेचें सरचिटणीस मि. ऊ थांट ह्यांनीं आपला पहिला अहवाल सादर केला आहे. त्यांत ते म्हणतात, कीं १९७० च्या सुमारास जगांतील वेकारांच्या संख्येंत वाढ होईल. त्याचप्रमाणें विकसनशील देशांतील भुकेल्या व निःसत्त्व अन्न खाणारांच्या संख्येंतहि वाढ होईल. विकास पावणाऱ्या देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नांत दरसाल ५ टक्के वाढ होईल अशी अपेक्षा संघटनेनें केली होती. परंतु वाढ ह्या गतीनें झालेली नाहीं. परिणामीं, विकसनशील व विकसित देशांतील दरडोई उत्पन्नांत आणखीच फरक पडला आहे.

**बिहारमधील इंजिनिअरांचे राजिनामे**—बिहारमधील १,५०० मुलकी इंजिनिअर्सनीं आपले राजिनामे मुख्य इंजिनिअरला सादर केले आहेत. सरकारनें पुन्हा पुन्हा व निःसंदिग्ध रीत्या दिलेल्या आश्वासनांचा भंग केला आहे असें त्यांचें म्हणणें आहे. इंजिनिअर्सना मिळणारा पगार वाढवावा आणि त्यांच्या नोकरीच्या परिस्थितींत सुधारणा करण्यांत यावी म्हणून त्यांनीं कांहीं मागण्या सरकारकडे केल्या आहेत.

**विद्युत्केंद्रें उभारण्यासाठी मदत**—भारतामधील विद्युत्-केंद्रें उभारण्याच्या कामीं रशिआ आपले तंत्रज्ञ भारताला पाठविण्यास तयार आहे, अशी माहिती मध्यवर्ती सरकारचे वीज व पाणीपुरवठा मंत्री श्री. के. एल. राव ह्यांनीं सांगितली आहे. बंगलोर येथील एंजिनिअर्सच्या संस्थेंत ते भाषण करीत होते. ते म्हणाले, कीं अफगाणिस्थान व रशिआ ह्यांच्या सरहद्दीवर एके ठिकाणीं ४० लाख किलोवॅट वीज निर्माण करणारें केंद्र उभारण्याची योजना रशिआ तयार करीत आहे. ह्या केंद्रांत निर्माण होणाऱ्या विजेपैकीं कांहीं वीज ६०० मैल दूर असलेल्या भारताला देण्याचा विचार रशिआ करील. एकत्रित वीजपुरवठ्याच्या कार्यक्षमतेचें व उपयोगाचें हें एक उदाहरण आहे.

**कॅनडाकडून मिळणारी मदत**—भारत, पाकिस्तान, सीलोन व मलेशिआ ह्या कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांना १९६५–६६ ह्या आर्थिक वर्षात कॅनडाकडून १०कोटी डॉलर्सची मदत मिळणार आहे. त्यापैकी भारताला सर्वांत अधिक म्हणजे ४·२ कोटी डॉलर्स मिळणार आहेत. ह्या देणग्यांच्या मदतीशिवाय अन्नाची टंचाई दूर करण्यासाठी १ कोटी डॉलर्स व १·२५ कोटी डॉलर्सची व्यापारी उधारीहि मिळणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



**सुवर्णरोख्यांना प्रतिसाद नाहीं**—सुवर्णरोख्यांना लोकांनीं दिलेला पाठिंबा फारसा उत्साहवर्धक नाहीं. सुवर्णरोख्यांची मूळची योजना रद्द करून रोखे घेणारांना त्यांनीं सोने कोठून आणलें असा प्रश्न विचारण्यांत येणार नसल्याचें गेल्या मार्चमध्यें जाहिर करण्यांत आलें होतें. तरीसुद्धां अवघे ३ कोटी रुपयांचेच सुवर्णरोखे खपले. लोकांना सोन्यांत व चांदींत आपली बचत गुंतविण्याची संवय फार पूर्वीपासून आहे, असें एक कारण देण्यांत येत आहे.

**टिटॅनिअम कारखान्याचा विस्तार**—त्रावणकोरमधील टिटॅनिअमचें उत्पादन करणाऱ्या सरकारी कारखान्याचा विस्तार व आधुनिकीकरण करण्याची योजना आंखण्यांत आली आहे. ह्या योजनेसाठी ४ कोटी रुपयांचा खर्च येणार असून ती पूर्ण झाल्यावर टिटॅनिअमच्या उत्पादनांत तिप्पट वाढ होईल. शिवाय, कारखान्याची वाढ झाल्यावर उत्पादनांत होणाऱ्या निरुपयोगी उपपदार्थांचाहि उपयोग होऊं लागेल.

**भिलई कारखान्याची सहावी भट्टी**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्यांत ६ वी झोतभट्टी बांधण्याच्या कामास लवकरच जोरानें प्रारंभ करण्यांत येईल. ह्या भट्टीची एका वेळेची उत्पादनक्षमता १,७१० घनमीटर आहे. भट्टीमधून दरसाल ५ लाख टन कच्चे लोखंड निर्माण करतां येईल. भट्टीची उभारणी करण्यासाठी रशिअन धातुशास्त्रज्ञ आलेले आहेत आणि ती उभारण्याबाबत भारत व रशिआ ह्यांच्यांत करारहि झालेला आहे.

**कलोन प्रदर्शनांत भाग घेणार**—काजूगरांची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न करणाऱ्या मंडळानें जर्मनींतील कलोन येथें भरणाऱ्या अन्न व खाद्य पदार्थांच्या प्रदर्शनांत भाग घेण्याचें ठरविलें आहे. प्रदर्शन दोन वर्षांतून एकदा भरविलें जातें आणि तें पश्चिम युरोपमधील अशा मोठ्या प्रदर्शनांपैकी एक असतें. भारताच्या दालनांत काजू, मसाल्याचे पदार्थ, चहा, कॉफी, तंबाखू, इत्यादि पदार्थ असतील.

**रशिआकडून होणारा तेलाचा पुरवठा**—भारतानें विनंती केल्यावरून रशिआ भारताला अधिक तेलाचा पुरवठा करूं लागला आहे. नव्या व्यवस्थेप्रमाणें दरमहा रशियाकडून येणाऱ्या पुरवठ्यांत तिपटीनें वाढ करण्यांत आली आहे. तेलाच्या पुरवठ्याबद्दल रशिया व भारत ह्यांचा करार झाला आहे. कराराप्रमाणें भारत ह्या वर्षी रशिआकडून २० लाख टनांपेक्षाहि अधिक तेल आयात करील.

**पोलादाच्या कारखान्यांची यंत्रसामग्री**—चौथा पंचवार्षिक कार्यक्रम पुरा झाला म्हणजे भारत नव्या पोलाद कारखान्यांना लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकी जवळजवळ ६० टक्के यंत्रसामग्री स्वतः पुरवूं शकेल अशी माहिती सांगण्यांत आली आहे. बोकॅरो येथें उभारावयाच्या ४ थ्या पोलाद कारखान्याच्या यंत्रसाहित्यापैकी ३० टक्के साहित्य रांची येथील व इतर कारखान्यांकडून मिळूं शकेल. कारखान्याचे अहवाल तयार करणें व त्यांची उभारणी करणें ह्या कामांसाठी भारताच्या तंत्रज्ञांना शिकवून तयार करण्यांत येत आहे.

**नैरोबींतील इस्पितळाला देणगी**—नैरोबींतील एका प्रसिद्ध हिंदी उद्योगपतीनें नैरोबीमधील केन्याटा राष्ट्रीय इस्पितळाला १ लाख पौंड म्हणजे १३ लाख रुपयांची देणगी जाहीर केली आहे. इस्पितळाचा विस्तार करण्याच्या कामीं आणि ४० नवीं आरोग्यकेंद्रें स्थापन करण्यासाठीं देणगीचा उपयोग करण्यांत येणार आहे. देणगीपैकी १२,५०० पौंडांचा चेक नुकताच देण्यांत आला.

**इराणमध्यें रबराच्या वस्तूंचा कारखाना**—इराणमध्यें रबराच्या वस्तू तयार करण्याचा एक कारखाना हिंदी कंपनीच्या सहकार्यानें उभारण्यांत येणार आहे. कारखाना उभारण्यासाठीं ७·५ लाख रुपये भांडवलाची कंपनी स्थापन करण्यांत येणार असून त्यापैकी एक तृतीयांश भांडवल हिंदी कंपनीचें असेल. हिंदी कंपनी कारखान्याला लागणारी यंत्रसामग्री व इतर साहित्य भारतामधून पुरविणार आहे.


## अल्पावधींत आम जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली
—आणि—
## उत्तरोत्तर प्रगतिपथावर असलेली
# जनता सहकारी बँक लि., सांगली

( कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली )
फोन नं. २४४ रजि. नं. २४०९८ पोस्ट बॅग नं. ९८
शाखा— मार्केट यार्ड — ( फोन नं. ४८४ )

प्रगतिपथावरील चालू बोलके आकडे

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेले शेअर भांडवल | रु. | २,५५,५०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ७६,५८० |
| एकूण ठेवी | रु. | १८,९८,६०० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ५१,०६,५०० |
| एकूण उलाढाल ( Turnover ) ( सन १९६५–६६ ) | रु. | ९,२१,१६,८०० |

( संपूर्ण सेवा ) खास वैशिष्ट्यें ( संपूर्ण सुरक्षितता

ज ] आकर्षक व्याजाचे दरानें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
न ] बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.
ता ] बँक सुरुवातीपासूनच २ टक्के डिव्हिडंड देत आली असून "अ" वर्गांत आहे.
बँ ] दि. २६–१–१९६५ पासून बचत निधि योजना चालू आहे.
क ] लोकल बॉडीज, नगरपालिका व ट्रस्ट ॲक्टखाली नोंदविलेल्या संस्थांच्या ठेवी स्वीकारण्यास मंजूरी मिळाली आहे.

एम्. एस्. कराळे, चेअरमन
एस्. एस्. पांड्याजी, मॅनेजर
आमदार वसंतरावजी पाटील, व्हा. चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ५९५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८३३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें